स्थायी निदेश क्र. १०-२०२३

राज्यातील अग्निशमन सेवेचे
बळकटीकरण करणेबाबत.

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका जुनी इमारत,**
**७ मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी.बेलापूर मुंबई ४००६१४**
**क्र.नपप्रसं/स्थायी नि./१०/२०२३/राज्य.अग्नी.सेवा./बळकटी/कक्ष-१२/5553**
**दिनांक :- 12 OCT 2023**

संदर्भ :

१) या कार्यालयाकडील स्थायी निदेश क्र. नप्रसं/अग्निशमन सेवा/२००५/प्र.क्र.३१४/९ दि. २५एप्रिल, २००५.
२) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६
३) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम २००९
४) शासन निर्णय, नगर विकास विभाग संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२७/नवि२० दि.१२ ऑगस्ट २०१६

# -: आदेश :-

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ आणि महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम २००९ अस्तित्वात आले आहेत तसेच बहुतांश सर्व नगरपरिषदांचे आकृतीबंध मंजुरी घेवून आवश्यक अग्निशमन कर्मचारी पदे निर्माण करण्यात आली आहेत. संदर्भिय कायदा आणि नियमांमध्ये स्थायी निदेश ३१ मधील बहुतेक निकष दिलेले आहेत. सदरचे स्थायी निदेश निष्प्रभावित करून खालील प्रमाणे सुधारित आदेश देण्यात येत आहेत.

१. अग्निशमन सेवा मधील काम करणाऱ्या वर्ग-३ व वर्ग-४ मधील नगरपालिकेच्या आकृतीबंधावरील पदाच्या संवर्गनिहाय पदांची कर्तव्य व जबाबदारी, किमान शैक्षणिक अर्हता व भरती पध्दती सेवा प्रवेश नियमानुसार राहतील.
२. **अग्निशमन व आणिबाणी सेवेसाठी उपलब्ध करावयाचा निधी** :- अग्निशमन सेवेपासूनचे उत्पन्न अत्यल्प असते मात्र त्यावरील वाहनांचा खर्च व कर्मचारी आस्थापना खर्च हा जास्त असतो. त्यामुळे अग्निशमन सेवा ही तोटयात असते. ही सेवा स्वावलंबी होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. अग्निशमन सेवेसाठी होणारा खर्च काही प्रमाणात वसूल व्हावा याकरीता अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांच्या शिफारशी विचारात घेऊन अग्निशमन सेवेपासून उत्पन्नाचे खालील नमूद केलेल्या स्त्रोतातून निधी उपलब्ध करावा. त्यासाठी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन नगरपरिषद/ नगरपंचायतीने हे दर लावावेत.

(अ) अग्निशमन व आणिबाणी सेवेच्या व्यवस्थापनासाठी शासन अधिसुचना नगर विकास विभाग क्र. एमयुजी १०८९/१२८८/प्र.क्र.४१/९१/नवि-३२ दिनांक

०१.०४.१९९२ नुसार नगरपरिषदांनी मालमत्ता कराच्या किमान २ टक्के दराने अग्निशमन कर आकारावा.

(आ) अग्निशमन यंत्रणा उभारण्यासाठी व अग्निशमन सेवा सक्षम करण्याच्या दृष्टीने नगरपरिषदेतील हद्दीत होणाऱ्या नवीन इमारतींवर अग्निशमन सेवा विकास शुल्क (कॅपिटेशन फी) आकारण्यात यावे

(इ) नगरपरिषद क्षेत्रातील उंच इमारतीच्या आवारातील आग विझविण्याच्या यंत्रणेचे निरिक्षण हे सहामाही/ वार्षिक करावे लागत असल्यामुळे त्यांच्याकडून वसूल करावयाचे निरिक्षण शुल्क

(ई) ना हरकत प्रमाणपत्र व वार्षिक नूतनीकरण प्रमाणपत्र शुल्क (महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ भारतीय विस्फोटक कायदा, दि गैस सिलेंडर नियम व दि पेट्रोलियम कायदा १९३४ नियम १९७६ नुसार)

(उ) विमा हक्क व पोलीस तपासासाठी अग्निशमन प्रमाणपत्र दर

(ऊ) औद्योगिक क्षेत्रामध्ये/ नगरपरिषद क्षेत्राबाहेर लागलेल्या आगीमुळे संबंधीतांकडून वसूल करावयाचे दर

(ऋ) नगरपरिषदेच्या हद्दीत अथवा हद्दीबाहेर अग्निशमन दलाकडील साधनसामुग्री दिल्यास आकारावयाचे दर

(ऌ) अग्निशमन सेवेसाठी दर व शुल्क आकारणी करताना एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्सहन नियमावलीतील UDCPR तरतुदी व EODB अंतर्गत शासनाचे निर्देश यांचे पालन होईल याची खबरदारी घ्यावी.

३. अग्निशमन वाहन संख्या आणि क्षमता ठरविण्याचे अधिकार नगरपरिषद/ नगरपंचायत यांना राहतील. परंतु महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ आणि महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम २००९ यांच्याशी विसंगत होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.

४. अग्निशमन वाहन खरेदी करण्यासाठी आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्या मंजुरीची आवश्यकता असणार नाही.

५. अग्निशमन केंद्र, कर्मचारी आणि अधिकारी यांचे निवास्थाने याबाबत शासन निर्णय, नगर विकास विभाग संकीर्ण-२००९/प्र.क्र.२११/नवि-२० दि.३१ ऑगस्ट २००९ चे पालन करावे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या धोरणाचे पालन करावे.

६. अग्निशमन कर्मचा-यांना देण्यात येणारे अतिरिक्त भत्ते, नगरपालिका सर्वसाधारण सभेने ठरवून देण्यात यावेत. मात्र हे गैरवाजवी व अन्य समान वर्गातील नगरपरिषद/नगरपंचायती यांच्याशी समान ठेवण्याची खबरदारी घ्यावी. यासाठी शासनाकडून कोणत्याही अनुदानाची मागणी करु नये.

७. हद्दीच्या बाहेर सेवा देण्यासाठी हद्दीची मर्यादा आणि त्यांची फी नगरपालिकेने सर्वसाधारण सभेचा ठराव घेऊन ठरवावी. तथापि, हे दर नगरपरिषद हद्दीतील दरापेक्षा किमान दीडपटीहून अधिक निश्चित करण्यात यावीत. हद्दी बाहेर सुविधा पुरविल्यास पूर्ण खर्च वसूल होईल अशा प्रकारचे दर निश्चित करण्यात यावीत.

८. अग्निशमन सेवेवरील कर्मचा-यांच्या कामाच्या वेळा ठरविण्याचे अधिकार नगरपरिषद/ नगरपंचायत ला असतील.

९. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम २५ नुसार अग्नि सुरक्षा निधीची स्थापना करावी.

१०.नगर विकास विभागामार्फत तालुक्याचा ठिकाणी नगरपंचायती/नगरपरिषदा स्थापना झाल्या आहेत व अशा नगरपंचायती/नगरपालिका करिता कर्मचारी आकृतिबंध मंजूर झाला आहे. शासन निर्णय, नगर विकास विभाग संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२७/नवि-२०दि.१२ऑगस्ट २०१६ नुसार महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान नव्याने निर्माण झालेल्या/होणाऱ्या नगरपरिषदा/नगरपंचायती मध्ये राबविण्याबाबत धोरणात्मक निर्णय झाला आहे. त्यानुसार महाराष्ट्र अग्निसुरक्षा सेवा संचालनालय यांनी शिफारस केल्यानुसार त्यांना अग्निशमन केंद्र व अग्निशमन वाहन याकरिता शासन हिश्याची रक्कम मंजूर करण्यात येते. परंतु कर्मचारी आकृतिबंध मध्ये अग्निशमन कर्मचारी अधिकारी यांची पदे मंजूर नसतात. अशावेळी नगरपंचायती यांनी आवश्यक वाहन चालक व फायरमन कंत्राटी तत्वावर घ्यावेत. व यावर होणारा खर्च कलम २५ नुसार स्थापन अग्निसुरक्षा निधी मधून व नगरपरिषद निधीतून भागविता येईल.

११.अनेक नगरपंचायती, नगर परिषदा व ग्रामपंचायतीमध्ये स्वतःचे अग्निशमन वाहन किवा अग्निशमन कर्मचारी उपलब्ध नसतात. परंतु आगीच्या घटना घडल्यास लगतच्या नगरपरिषदेकडून वाहन मागविण्यात येते. सध्यापरिस्थितीत नगर परिषद यांचा अग्निशमन केंद्र चालविण्याचा खर्च केवळ संबंधित नगर परिषद मध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम २५ नुसार अग्निसुरक्षा निधीमधून भागविणे शक्य नाही. हा आर्थिक ताण कमी करणेसाठी ज्या नगरपरिषद/नगरपंचायत व ग्रामपंचायत यांच्याकडे अग्निशमन वाहन नाही. अशा सर्व ठिकाणी सुद्धा कलम २५ प्रमाणे अग्निसुरक्षा निधी स्थापन करावा. व दरवर्षी हा निधी संलग्न (पालक) नगरपरिषदला हस्तांतरित करण्यात यावा.

१२.ज्या सेवा घेणाऱ्या संलग्न/नजीकच्या नगरपरिषदा/नगरपंचायती किवा ग्रामपंचायती असा निधी उभा करून पालक नगरपरिषदेकडे हस्तांतारित करणार नाही त्या क्षेत्रात सेवा दिल्यास वरील क्र. ७ नुसार जादा दराने किवा मूळ दराचे दुप्पट दर या पैकी जे दर जास्त असतील त्या दराने शुल्क वसूल करावे.

या आदेशात काहीही नमूद केलेले असले तरी, कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ व नगरपरिषद लेखासहिता २०११ मधील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची खबरदारी नगरपरिषदांनी घेणे आवश्यक राहील.

हे आदेश केवळ मार्गदर्शक असून या आदेशामुळे कोणतेही शासन निर्णय किवा नियम यांचे निर्देशापेक्षा वेगळा अर्थबोध होत असल्यास मूळ शासन निर्णय किवा नियम यामधील तरतुदी ग्राह्य राहतील.

आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई

Manoj Vijay Ranade

Digitally signed by Manoj Vijay Ranade
Date: 2023.10.12 15:34:12 +05'30'

**(मनोज रानडे भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय नवी मुंबई**

**प्रति,**

१) विभागीय सह आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)

२) जिल्हा सह आयुक्त , नगरपरिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालये (सर्व ).

३) अध्यक्ष /प्रशासक , नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व).

४) मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व)

प्रत माहितीसाठी सविनय सादर :

१) मा. प्रधान सचिव ( २ ), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) विभागीय आयुक्त , नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालये ( सर्व ).

३) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.

४) सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा,सर्व विभाग.

५) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई ( सर्व कार्यासन ).

६) निवड नस्ती.